


RNI NO-MAHMAR/2022/90217

दैनिक निडर निर्भिड
# जनसंचलन
व्यापक जनचळवळीचा प्रहरी!

संपादक : जितेंद्र कायस्थ

Email- jansanchlan@gmail.com
Mob- 9822720784







वर्ष ३ रे अंक : १८५ वा शनिवार दि ०६ सप्टेंबर २०२५ पृष्ठ ८ किंमत ३ रुपये

# कोकणात उबाठाला खिंडार,उद्धव ठाकरेंच्या विश्वासू समर्थकांनी साथ सोडली, सामंत बंधूंचा धमाका

**वृत्तसंस्था/ रत्नागिरी**

कोकणात आगामी स्थानिक स्वराज्य संस्था निवडणुका लक्षात घेता राजकीय घडामोडींना वेग आला आहे. उद्योग मंत्री उदय सामंत यांचे ज्येष्ठ बंधू आणि शिवसेना आमदार किरण उर्फ भैया सामंत यांनी शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) पक्षाला धक्का दिला आहे. सामंत राजापूर मतदारसंघात ॲक्शन मोडवर आले असून गेले काही महिने त्यांचे प्रत्येक गावात दौरेही सुरु आहेत. आगामी स्थानिक स्वराज्य संस्था निवडणूक लक्षात घेत त्यांनी आपले नेटवर्क स्ट्राँग करण्यास सुरुवात केली आहे. मतदारसंघातील प्रत्येक जिल्हा परिषद गटावर किरण सामंत यांनी लक्ष केंद्रित केलं आहे. याच दरम्यान किरण सामंत यांची सुकन्या अपूर्वा सामंतही गेले काही महिने मतदारसंघात ॲक्टिव्ह आहेत. त्याच वेळी मंत्री सामंत बंधूंनी अलिकडे शिवसेनेत पक्षप्रवेशांचा धुमधडाका लावला आहे. गणेशोत्सवाचे औचित्य साधून दोन्ही बंधूंनी गणपती दर्शन कार्यक्रमाच्या निमित्ताने वैयक्तिक गाठीभेटी सुरु केल्या. याच वेळी पक्षप्रवेश कार्यक्रम घेत आगामी निवडणुकीच्या तयारीचे स्पष्ट संकेत दिले आहेत. लांजा राजापूर साखरपा मतदारसंघातील ताम्हणे सौंदरकरवाडी व ताम्हाणे वरचीवाडीतील ठाकरे गटातील ताम्हणे सरपंच समीक्षा बावस्कर यांच्यासह ठाकरे गटाचे खंदे समर्थक असलेले ज्येष्ठ शिवसैनिक रवींद्र सावंत, शाखाप्रमुख भाई अडसूळ यांच्यासह ज्येष्ठ शिवसैनिक व कार्यकर्त्यांनी काही ग्रामस्थांनी उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षातून शिंदेंच्या शिवसेनेत जाहीर प्रवेश केला आहे. यावेळी पाचल विभागातील उद्धव ठाकरे गटातील अनेक पदाधिकाऱ्यांनीही प्रवेश केला आहे. उपमुख्यमंत्री व शिवसेनेचे मुख्य नेते एकनाथ शिंदे यांच्या धोरणांवर व आमदार किरण सामंत यांच्या कार्यशैलीवर विश्वास ठेवून या भागातील शेकडो ग्रामस्थांनी शिवसेना पक्षात प्रवेश केल्याची प्रतिक्रिया या पदाधिकारी व कार्यकर्त्यांनी दिली आहे. राजापूर तालुक्यातील पाचल विभागात शिवसेनेत मोठा पक्षप्रवेश झाला असून उद्धव ठाकरे गटाला खिंडार पडले आहे. पाचल येथे झालेल्या शिवसेना पक्षप्रवेश कार्यक्रमावेळी आमदार किरण सामंत यांनी उपस्थित ग्रामस्थांशी संवाद साधला. माझ्यावर ज्यांनी ज्यांनी विश्वास ठेवून शिवसेना पक्षात प्रवेश केला आहे, त्या प्रत्येकाच्या विश्वासाला कुठेही तडा जाऊ देणार नाही. पाचलसह संपूर्ण राजापूर तालुक्याचा विकास हा माझा ध्यास आहे. आपल्या सर्वांच्या सोबत काम करताना विकासकामांसाठी निधी कमी पडू देणार नाही, असा शब्दही त्यांनी ग्रामस्थांना दिला आहे



कार्यक्रमाला विधानसभा क्षेत्र प्रमुख राजू कुरूप, तालुकाप्रमुख दीपक नागले, ज्येष्ठ मार्गदर्शक आप्पा साळवी, सुनील गुरव, आरडीसी बँकेचे संचालक मुन्ना खामकर, सुप्रसिद्ध उद्योजक बाबाशेठ भिंगार्डे, शैलेश साळवी, अमर जाधव, आत्माराम सुतार, सरपंच समीक्षा वाफेलकर, रवी सावंत, रमेश चव्हाण, अमित साळवी, मनीष लिंगायत, उदय राणे, संदीप बारसकर, भाई अडसूळ, शिवराम इस्कर तसेच स्थानिक पदाधिकारी, ग्रामस्थ व शिवसेना कार्यकर्त्यांची मोठ्या संख्येने उपस्थिती होती.

## अज्ञात वाहनाच्या धडकेत ५५ वर्षीय महिलेचा मृत्यू: चालकाविरुद्ध गुन्हा

**जनसंचलन/ देऊळगाव राजा**

देऊळगाव मही येथे रस्त्याने जात असताना अज्ञात वाहनाने दिलेल्या जोरदार धडकेत ५५ वर्षीय महिलेचा मृत्यू झाल्याची घटना १ सप्टेंबर रोजी घडली. याप्रकरणी संबंधित वाहनचालकाविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे. विठाबाई पुंडलिक बनसोडे (वय ५५, रा. देऊळगाव मही) या दिग्रस रस्त्याने शेतात जात होत्या. दरम्यान, अज्ञात वाहनचालकाने निष्काळजीने व वेगाने वाहन चालवून त्यांना पाठीमागून जोरदार धडक दिली. या अपघातात त्यांच्या डोक्याला गंभीर दुखापत झाली.




जखमी अवस्थेत त्यांना तत्काळ देऊळगाव मही ग्रामीण रुग्णालयात हलविण्यात आले; मात्र प्राथमिक उपचारानंतर अधिक उपचारासाठी त्यांना जालना येथील घाटी रुग्णालयात हलविण्यात आले. तेथे उपचार सुरू असताना विठाबाई बनसोडे यांचा मृत्यू झाला. या प्रकरणी रामेश्वर कुंडलिक बनसोडे यांनी देऊळगाव राजा पोलिस ठाण्यात फिर्याद नोंदवली असून, अज्ञात वाहनचालकाविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पोलिस हेडकॉन्स्टेबल कलीम देशमुख पुढील तपास करीत आहेत.

## बुलडाणा अर्बन गणेशोत्सव मंडळाकडून कर्मचाऱ्यांना वृक्ष भेट!

**जनसंचलन/बुलढाणा**

दरवर्षी प्रमाणे याही वर्षी बुलडाणा अर्बन परिवाराकडून बुलडाणा अर्बन कर्मचारी गणेशोत्सव मंडळाची स्थापना करण्यात आली. बुलडाणा अर्बन कर्मचारी गणेशोत्सव मंडळाचे वतीने यावर्षीही गणेश उत्सवानिमित्त विविध सांस्कृतिक व मनोरंजनात्मक कार्यक्रमाचे थाटात आयोजन करण्यात आले. दरम्यान मंडळाच्या कर्मचाऱ्यांना वृक्ष भेट देऊन पर्यावरण संवर्धनाचा जागर करण्यात आला आहे. गणेश मंडळाचे २४ वे वर्ष असून यावर्षी २७ ऑगस्ट ते ६ सप्टेंबर २०२५ या कालावधीत गणेशोत्सव साजरा करण्यात येत आहे. गणेश उत्सवानिमित्त संस्थेने गणेश उत्सव मंडळाचे प्रमुख मार्गदर्शक संस्थापक अध्यक्ष राधेश्याम चांडक उपाख्य भाईजी, संस्थेचे अध्यक्ष डॉ. सुकेश झंवर, बुलडाणा अर्बन चॅरिटेबल सोसायटीच्या अध्यक्षा सौ.




कोमलताई सुकेश झंवर, अनंतभाऊ देशपांडे संस्थेचे सरव्यवस्थापक कैलास कासट यांच्या मार्गदर्शनाखाली ३ सप्टेंबर रोजी संस्थेच्या गोवर्धन इमारतीच्या तळमजल्यावरील पार्किंग मध्ये कर्मचाऱ्यांसाठी वृक्षारोपणाचा संकल्प राबविला. कर्मचाऱ्यांना आंबा या वृक्षांचे वाटप करण्यात आले. यावेळी बुलडाणा अर्बन कर्मचारी गणेशोत्सव मंडळाचे अध्यक्ष उपाध्यक्ष कार्यकारिणीचे सर्व सदस्य उपस्थित होते. संस्थेच्या वतीने देण्यात येणाऱ्या आंबा वृक्षांचे वृक्षमित्र म्हणून त्याचे वर्षभर संगोपन करण्यात येणार असल्याचे कर्मचाऱ्यांनी सांगितले.

# बाप्पाला निरोप - श्रध्दा, उत्साह आणि पर्यावरणाची जबाबदारी !

## संपादकीय लेख




गणपती बाप्पा मोरया, पुढच्या वर्षी लवकर या गणेशोत्सव हा महाराष्ट्राच्या सांस्कृतिक आणि धार्मिक जीवनाचा आत्मा आहे. दहा दिवस भक्तिभावाने घरोघरी आणि सार्वजनिक मंडळांत विराजमान झालेल्या गणरायाचा निरोप म्हणजेच गणेश विसर्जन. ङ्गगणपती बाप्पा मोरया, पुन्हा वर्षी लवकर याफ या गजरात नाचत-गात, ढोल-ताशांच्या तालावर, फुलांच्या वर्षावात गणेशाच्या मूर्तींचे विसर्जन केले जाते. परंतु या जल्लोषामागे काही गंभीर प्रश्न दडलेले आहेत, जे आपण विसरतो. गणेश विसर्जन म्हणजे केवळ धार्मिक विधी नाही. मातीपासून तयार झालेली मूर्ती जलात विसर्जित करणे म्हणजेच गणेश पुन्हा पंचतत्त्वात विलीन होणे, जीवन आणि मृत्यूच्या शाश्वत सत्याचा स्वीकार करणे होय. त्यामुळे हा विधी आत्मचिंतन व अध्यात्माचा संदेश देणारा आहे.

गणेश चतुर्थी ते अनंत चतुर्दशीपर्यंत गणेशोत्सव साजरा केला जात असतो. गणेश चतुर्थीपासून गणपती बाप्पा संपूर्ण देशभर आपल्या भक्तांच्या घराघरात विराजमान होतात. गणेशोत्सव सुरू झाल्यानंतर दहाव्या दिवशी संपतो, जेव्हा मूर्ती सार्वजनिक मिरवणुकीत संगीत आणि सामूहिक मंत्रोच्चारात नेली जाते, त्यानंतर नदी किंवा समुद्रासारख्या जवळच्या पाण्यात विसर्जित केली जाते, ज्याला विसर्जन म्हणतात. गणेश विसर्जनाच्या वेळी मंत्रोच्चार केल्याने गणपती बाप्पा प्रसन्न होतो आणि भक्तांवर आशीर्वादाचा वर्षाव करतो आणि त्यांना जीवनात सुख, समृद्धी आणि आनंद देतो. घरांमध्ये आणि सार्वजनिक पंडाल (मंडप) मध्ये गणेशमूर्ती स्थापित करणे आणि त्यानंतरचे विसर्जन हे विश्वातील निर्मिती आणि विघटन चक्राचे प्रतीक आहे.

विसर्जन मिरवणुका समाजातील ऐक्याचे द्योतक आहेत. वेगवेगळ्या समाजघटकांतील, पिढ्यांतील, वर्गांतील लोक एकत्र येतात. उत्साह, गजर, नृत्य, फुलांचा वर्षाव यातून ङ्गसामूहिक आनंदफ प्रकट होतो. परंतु हाच उत्साह कधी कधी बेभान होतो आणि ध्वनीप्रदूषण, वाहतूककोंडी, अपघात अशा समस्याही वाढतात. सर्वात गंभीर बाब म्हणजे विसर्जनामुळे होणारे जलप्रदूषण. प्लॅस्टर ऑफ पॅरिसच्या मूर्ती, रासायनिक रंग, प्लॅस्टिकच्या सजावटी या थेट नद्या, तलाव, समुद्राचे पाणी दूषित करतात. जलीय प्राण्यांचा मृत्यू होतो, पिण्याच्या पाण्यावरही परिणाम होतो. विसर्जनानंतर तलावांच्या काठावर विखुरलेले कचरे, फुलांच्या माळा, न वापरलेली सजावट हे शहराचे कुरूप चित्र दाखवतात. उत्सवाचा आनंद घेणे प्रत्येकाचे हक्क आहे. पण या आनंदासोबत निसर्गाची काळजी घेणे ही आपली जबाबदारी आहे. मातीच्या मूर्तींचा वापर, नैसर्गिक रंग, कृत्रिम तलावांत विसर्जन, प्लॅस्टिक टाळणे हे उपाय आपण स्वीकारले पाहिजेत. अनेक शहरांमध्ये ङ्गघरगुती विसर्जन तलावफ ही संकल्पना लोकांनी हळूहळू आत्मसात केली आहे, ही सकारात्मक बाब आहे.

बऱ्याच लोकांना वाटते की, गणेशाची प्राण प्रतिष्ठापना फक्त चतुर्थीलाच होते, तर तसे नाही. काही ठिकाणी प्रतिप्रदेला गणरायाची प्राण प्रतिष्ठापना केली जाते. प्रतिपदेपासून दशमीपर्यंत असे १० दिवस हा उत्सव साजरा केला जातो. काही ठिकाणी गणेश चतुर्थीपासून अनंत चतुर्दशीपर्यंत असे १० दिवस गणेशोत्सव साजरा होतो. गणपतीची प्राण प्रतिष्ठापना केल्यानंतर त्याची पूजा करून विसर्जन करण्याचे हे व्रत एक किंवा दीड दिवसाचे आहे. पण उत्सवात आणखी रंगत आणण्यासाठी किंवा कित्येक जण नवस पूर्ण करण्यासाठी पाच दिवस, सात दिवसांनी गणेशमूर्तींचे विसर्जन करतात. त्यामागे कोणतेही शास्त्रीय कारण नाही. गणेशभक्त आपल्या हौसेनुसार गणेशमूर्तींचे विसर्जन दीड, दोन, पाचव्या किंवा सातव्या किंवा दहाव्या दिवशी करतात. हे दिवस आनंदात-उत्साहात गेल्यानंतर गणपती बाप्पाला निरोप देण्याची वेळ येते आणि नियमानुसार प्रथेनुसार गणेशाचे विसर्जन करण्याची प्रथा आहे.

गणपती विसर्जनाशी निगडीत अनेक गोष्टी आहेत. त्यापैकी एक म्हणजेच गणपतीला जल तत्वांचा अधिपती मानलं जातं. त्यांच्या विसर्जनाचं मुख्य कारण तर हेच आहे की, अनंत चतुर्दशीच्या दिवशी गणपतीची पूजा-अर्चा करून त्यांना पुन्हा पाण्यात विसर्जित केलं जातं. म्हणजेच ते ज्याचे अधिपती आहेत तिथे त्यांना पोहोचवलं जातं. निसर्गाच्या प्रत्येकच गोष्टीचे एक चक्र आहे, ज्या गोष्टीची सुरुवात होते तिचा शेवट हा नक्कीच होतो. निसर्गाचा हा कालचक्राचा नियम गणेश विसर्जनातून दिसून येतो. निसर्गाच्या अंशापासून गणपतीची मूर्ती तयार होते आणि शेवटी निसर्गतःच ती विलीन होते. गणेश विसर्जनाच्या वेळेस विसर्जन हे फक्त मूर्तींचेच करायचे नसते तर आपल्यातील दुर्गुणांचे सुद्धा करायचे असते.

अनंत चतुर्दशीचा दिवस, एकट्या मुंबईत वर्षाला सुमारे दीड लाख मूर्तींचे विसर्जन केले जाते. गणपती विसर्जन पाण्यातच कां केले जाते, या विधी मागे सुध्दा काही धार्मिक कारणे आहेत. तसेच हिंदू धर्मात अनेक विधी हे निसर्गाशी निगडीत आहे. निसर्गाशी एकरूपता राखण्याचा संदेश वेगवेगळ्या पद्धतीने कायमच दिला जातो, गणपती विसर्जनांच्या बाबतीतही असेच आहे. ज्यावेळी महर्षी व्यास महाभारताची निर्मिती करत होते, त्यावेळी गणपती बाप्पा लेखनिकाची भूमिका बजावत होते. महाभारत लिहिण्याचे काम हे दहा दिवस अविरतपणे चालू होते. त्यामुळे गणपती बाप्पांनी शरीर गरम न व्हावे म्हणून अंगाला माती लिंपल्याचे उल्लेख आहे. हा गणपती बाप्पांचा विशेष अवतार असल्यामुळे त्यांना दहा दिवसानंतर जलसमाधी देतात अशी वंदता आहे. कदाचित या दहा दिवसात बाप्पाची ऊर्जा टिकून राहावी म्हणून नैवैद्यासाठी गोडधोड, मोदक वगैरे करण्याची परंपरा आहे. अहोरात्र लिहिण्याच्या कामामुळे शरीर उष्ण झाल्यामुळे पाण्यात डुबकी मारल्याविना गत्यंतर नव्हती असेही अख्यायिका आहे. त्यामुळे गणपतीचे विसर्जन अनंत चतुर्दशीच्या दिवशी करतात.

गणेश विसर्जन हा आपल्या संस्कृतीतील श्रद्धा, भक्ती आणि एकात्मतेचा उत्सव आहे. मात्र तो पर्यावरणाच्या हानीचा कारणीभूत ठरू नये. ङ्गबाप्पा पुन्हा वर्षी लवकर याफअसे गजर करताना आपण त्याला प्रदूषित नद्या, रासायनिक कचऱ्याचा डोंगर दाखवला तर ती खरी भक्ती ठरेल का? आता वेळ आली आहे की श्रद्धा आणि जबाबदारी यांचा समतोल राखावा. गणेशोत्सव पर्यावरणपूरक झाला तरच आपले मोरया खऱ्या अर्थाने गजर ठरेल.

लेखक
प्रविण बगाडे

# कमिशनखोरीमुळे ६ महिन्यात रस्ता उखडला!

## दोषी ठेकेदार व अधिकाऱ्यांवर कारवाईची मागणी!

**जनसंचलन/ डोणगाव**

लोकप्रतिनिधी, अधिकारी आणि ठेकेदार या त्रिकुटांनी डोणगाव जवळील शेलगाव देशमूख ते विशवी रस्ता ६ महिन्यापूर्वी केला होता मात्र रस्त्यावरील डांबर गायब होऊन गिट्टी उघडी पडली आहे. परिणामी आता झालेला खड्डेमय रस्ता अपघातांना निमंत्रण देत आहे. दरम्यान दोषी ठेकेदार व अधिकाऱ्यांवर कारवाईची मागणी जोर धरू लागली आहे. डोणगाव जवळील शेलगाव देशमूख ते विशवी रस्ता ६ महिन्यापूर्वी केला होता.डांबरीकरण करताना पुरेसा डांबराचा वापर न केल्याने ठिकठिकाणी टाकलेली खडी उखडून खड्डे पडलेत. रस्ता आता उखडला असून या रस्त्यावर अपघात नित्याची बाब झाली आहे. बांधकाम विभाग रस्त्याचे बांधकाम करीत आहे की, लोकांच्या मरणासाठी खड्डे खोदण्याची व्यवस्था करीत आहे, असा प्रश्न प्रवासी व या मार्गावरील नागरिक विचारीत आहेत.



रस्त्याच्या बांधकामाची चौकशी क्वॉलिटी कंट्रोल विभागाकडून करण्यात यावी, अशी मागणी नागरिकांनी केली आहे. विरोधी पक्षही यावर चुप्पी साधून असल्याने प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे.




*The Daily News Paper Jansanchalan printed by owner, publisher and editor Jitendra Devchand Kayastha at Sarvadnya Printers Buldhana and published at Dainik Jansanchalan Office Shivshopping Complex Buldhana. Dainik Janasanchalan printers, owners and editors do not necessarily agree with the opinions published in the issue* Court. 9822720784.
(RNI NO-MAHMAR/2022/90217) Email- jansanchlan@gmail.com

दैनिक जनसंचलन निडर निर्भिड
व्यापक जनचळवळीचा प्रहरी!



# नारायण राणे यांच्यावर शस्त्रक्रिया, मुंबईच्या जसलोक रुग्णालयातून डिस्चार्ज

**मुंबई :** भाजपचे ज्येष्ठ नेते विद्यमान खासदार तथा राज्याचे माजी मुख्यमंत्री नारायण राणे यांना आता रुग्णालयातून डिस्चार्ज मिळाला आहे. नारायण राणे यांना दोन दिवसांपूर्वी मुंबईच्या जसलोक रुग्णालयात दाखल करण्यात आलं होतं. जसलोक रुग्णालयाच्या तज्ज्ञ डॉक्टरांनी नारायण राणे यांची वैद्यकीय तपासणी केली.


यानंतर डॉक्टरांच्या सल्ल्यानुसार नारायण राणे यांच्यावर शस्त्रक्रिया पार पडली आहे. तसेच नारायण राणे यांची प्रकृती आता ठिक असून त्यांना आज रुग्णालयातून डिस्चार्ज देखील मिळाला आहे, अशी माहिती एका वृत्त वाहिनीने दिली आहे. नारायण राणे यांना दोन दिवसांपूर्वी बुधवारी ३ सप्टेंबरला जसलोक रुग्णालयात दाखल करण्यात आलं होतं. काही माध्यमांनी याबाबत वृत्त दिलं होतं. यानंतर नारायण राणे यांची प्रकृती ठीक असून त्यांच्यावर उद्या रुग्णालयात शस्त्रक्रिया करण्यात येणार असल्याची माहिती त्यांचे पुत्र मंत्री नितेश राणे यांनी दिली होती. त्यानुसार नारायण राणे यांच्यावर काल यशस्वी शस्त्रक्रिया करण्यात आली आहे. तसेच त्यांची प्रकृती आता ठिक असून त्यांना आज रुग्णालयातून देखील डिस्चार्ज मिळाला आहे. राज्यभरात गणेशोत्सवाचा उत्साह आहे. नारायण राणे यांच्या मुंबई येथील अधीश या निवासस्थानी देखील गणरायाचं आगमन झालं होतं. नारायण राणे यांच्याकडून ट्विट करुन याबाबत माहिती देण्यात आली होती. नारायण राणे आनंदात होते. विशेष म्हणजे राज्याचे उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी नारायण राणे यांच्या घरी जात बाप्पाचं दर्शन घेतलं होतं. यानंतर ३ सप्टेंबरला अचानक नारायण राणे



यांना रुग्णालयात दाखल केल्याची माहिती समोर आली होती.आमदार रोहित पवार यांनीदेखील ट्विट करत याबाबत माहिती दिली होती. पण आता नारायण राणे ठिक आहेत, अशी माहिती मिळत आहे. शस्क्रियेनंतर नारायण राणे यांना काही दिवस आराम करावे लागतील. त्यानंतर ते पुन्हा सर्वसामान्यांच्या कामांसाठी कामाला लागतील. त्यांनी लवकर बरे व्हावे, अशी प्रार्थना त्यांच्या कार्यकर्त्याकडून आणि राजकीय वर्तुळाकडून करण्यात येत होती. आता ते बरे झाल्याची माहिती आहे. तसेच ते लवकरच पूर्णपणे बरे होतील आणि जनसामान्यांच्या कामासाठी कामाला लागतील.

# पुण्यात टोळी युद्धाचा भडका, वनराज आंदेकर खून प्रकरणातील आरोपी गणेश कोमकरच्या मुलाचा खून

**पुणे :** गणेश विसर्जनच्या पूर्वसंध्येला पुण्यात टोळी युद्धाचा भडका उडालेला बघायला मिळतोय. पुण्यातील नाना पेठत परिसरात गँगवॉररची घटना घडली. हल्लेखोरांनी तरुणावर तीन गोळ्या झाडल्या असून त्याचा मृत्यू झाल्याची प्राथमिक माहिती समोर आली आहे. गोळ्या झाडून खून झालेला तरुण म्हणजे गणेश कोमकरचा मुलगा आयुष कोमकर असल्याचे स्पष्ट झाले आहे. गणेश कोमकर हा एक वर्षापूर्वी झालेल्या राष्ट्रवादी काँग्रेसचे माजी नगरसेवक वनराज आंदेकर खून प्रकरणातील आरोपी होता. या घटनेमुळे परिसरात भीतीचे वातावरण पसरले असून पोलिसांनी गुन्हा नोंदवून तपास सुरू केला आहे.विशेष म्हणजे नुकतंच पोलिसांनी हे टोळीयुद्ध उधळून लावलं होतं. पण तरीही गुन्हेगारांना रोखण्यात पोलिसांनी यश आलं नाही. पुण्यात एकीकडे गणेशोत्सवाचा उत्साह आहे. उद्या गणेशोत्सवाचा शेवटचा दिवस आहे. उद्या मानाच्या गणपतींच्या विसर्जन मिरवणुका शहरातून निघतील. असं असताना पुण्यातील नाना पेठेत एका तरुणावर तीन गोळ्या झाडल्याचा प्रकार समोर आला आहे. या गोळीबारात तरुणाचा मृत्यू झाल्याची प्राथमिक माहिती आहे. मिळालेल्या माहितीनुसार, एक वर्षापूर्वी राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या नगरसेवकाच्या खुनाच्या प्रकरणातील आरोपीच्या मुलाचा खून करण्यात आला आहे. या घटनेमुळे पुण्यात एकच खळबळ उडाली आहे.विशेष म्हणजे पुणे पोलिसांनी नुकताच हत्येचा डाव उधळला होता. माजी नगरसेवक वनराज आंदेकर यांची एक वर्षापूर्वी हत्या करण्यात आली होती. त्यांच्या हत्येचा बदला घेण्यासाठी रविवारी तयारी करण्यात आली होती. पण पोलिसांना याबाबत माहिती मिळाली होती. त्यामुळे पोलिसांनी वॉच ठेवणाऱ्यांच्या मुसक्या आवळत अटक केली होती. पण त्याचे इतर साथीदार पळून जाण्यात यशस्वी ठरले होते. हत्येचा कट रचणारा मुख्य सूत्रधार पोलिसांच्या हाती लागला नव्हता. पोलीस त्याचा शोध घेत होते. या दरम्यान, आज हत्येची घटना घडली. पोलिसांकडून उद्याच्या गणेशोत्सवाची तयारी केली जात आहे. असं असताना नाना पेठेत अचानक हत्येची घटना घडली. आता या प्रकरणातील आरोपींचा शोध घेणं हे पुणे पोलिसांपुढे आव्हान



असणार आहे.पुण्यात गुंड बंडू आंदेकर टोळी विरुद्ध सूरज ठोंबरे टोळी असं वैर वाढलं आहे. हा संघर्ष गेल्या अनेक वर्षांपासूनचा आहे. आंदेकर टोळीने २०२३ मध्ये ठोंबरे टोळीचे शुभम दहिभाते आणि निखिल आखाडेवर नाना पेठेत हल्ला केला होता. या हल्ल्यात निखिल आखाडेकर याचा मृत्यू झाला होता. त्यामुळे ठोंबरे टोळीत संतापाची लाट पसरली होती. त्यामुळे त्याचा बदला घेण्यासाठी ठोंबरे टोळीने आंदेकर टोळीचा बॅकबोन म्हणून ओळख असलेल्या माजी नगरसेवक वनराज आंदेकर यांची हत्या केली होती. नाना पेठेतील तालीम परिसरात वनराज यांची हत्या करण्यात आली होती. त्यांच्या हत्येचा बदला घेण्याचा प्रयत्न नुकताच रविवारी करण्यात आला होता. पण आरोपींचा तो डाव फसला होता. पण आज पोलीस गणपती विसर्जनासाठी कामात व्यस्त असल्याची संधी साधत आरोपींनी डाव साधला. या हल्ल्यात तरुण मुलाचा मृत्यू झाला आहे.

# त्रिभाषा धोरण निश्चितीसाठी सरकारकडून समिती सदस्यांची नियुक्ती...



**मुंबई :** राज्यात त्रिभाषा धोरणावरुन वाद निर्माण झाला होता. तिसरी भाषा म्हणून हिंदी सक्तीला कडाडून विरोध करण्यात आला. राज्यातील शैक्षणिक संघटनांसह अनेक पक्षांनी राज्य सरकारच्या त्रिभाषा सुत्राविरोधात आक्रमक पवित्रा घेतला. मनसेसह शिवसेना ठाकरे गटाने याविरोधात मोठे आंदोलन उभारले. राज्यात विरोधाची धार वाढतानाचे पाहून सरकारने त्रिभाषा सुत्राचे दोन्ही जीआर मागे घेतले. आणि सुत्रावर पुर्नविचार करण्यासाठी डॉ. नरेंद्र जाधव यांच्या अध्यक्षतेखाली समिती नियुक्ती केली. याबाबत आता मोठी बातमी समोर येत आहे. या त्रिभाषा धोरण निश्चितीसाठी जाधव समितीतील सदस्यांनी नेमणूक करण्यात आली आहे. राज्य सरकारने या नेमणुकीसंदर्भातील शासन निर्णय जारी केला आहे.राष्ट्रीय शिक्षण धोरण २०२० च्या अनुषंगाने राज्यातील शाळांमध्ये त्रिभाषा धोरण निश्चित करण्यासंदर्भात शिक्षणतज्ज्ञ डॉ. नरेंद्र जाधव यांच्या अध्यक्षतेखाली संदर्भाधीन दिनांक ३० जून, २०२५ रोजीच्या शासन निर्णयान्वये समिती गठित करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. त्या अनुषंगाने समिती सदस्यांची नियुक्ती करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती. त्यास अनुसरुन शासन पुढीलप्रमाणे निर्णय घेत आहे.दरम्यान राज्य सरकारच्या त्रिभाषा धोरण सुरुवातीपासूनच वादाच्या भोवऱ्यात अडकले होते. त्यात पहिलीपासून हिंदी सक्ती केल्याने हा वाद उफाळला आहे. या शासननिर्णयाविरोधात जनमानसात रोष पाहायला मिळाला. तर अनेक संघटनांनी आणि मनसेने आक्रमकपणे शासन निर्णयाविरोधात पवित्रा घेतला. मनसेने तर याविरोधात मोठे आंदोलनही उभारले, ज्याला नंतर शिवसेना ठाकरे गटाचाही पाठिंबा मिळाला. त्यामुळे राजकीय वातावरण चांगलेच तापलेले पाहायला मिळाले. वाढता विरोध पाहता सरकारने दोन्ही शासन निर्णय मागे घेतले.त्रिभाषा धोरणाच्या अभ्यासासाठी डॉ. नरेंद्र जाधव यांच्या अध्यक्षतेखाली समितीची नियुक्ती करण्यात आली आहे. त्याच समितीमधील सदस्य आज नियुक्त करण्यात आले. समिती आपला सविस्तर अहवाल सादर करेल.

## बाप थोडा संतापला, लेकाला राग अनावर, जन्मदात्या आईसमोर बापाला संपवलं; महाराष्ट्र हादरला...




**नागपूर :** मद्यधुंद मुलाने चाकूने वार करून आईसमोरच वडिलांचा खून केला. ही थरारक घटना रामटेक पोलिस ठाण्याच्या हद्दीतील पिंडकापार येथे घडली. या प्रकरणी पोलिसांनी खुनाचा गुन्हा दाखल करून मारेकरी मुलाला अटक केली. भाऊराव गोविंदा मांढरे (वय ७८), असं मृतकाचं तर रवींद्र उर्फ रवी भाऊराव मांढरे (वय ३३), असं अटकेतील मारेकरी मुलाचं नाव आहे.

रवी याला दारूचे व्यसन आहे. तो काम करीत नाहीत. काल बुधवारी रात्री ८ वाजता रवी हा दारू पिऊन घरी आला व खोलीत झोपला. यादरम्यान भाऊराव, रवीची आई मैनाबाई (वय ६८) रवीची पत्नी भारती यांनी जेवण केले. ङ्गरवी याला नवीन जाळं व नवीन नाव घेऊन दिली. तरी तो काम करीत नाही. सतत दारू पिऊन बडबड करतोय, असं भाऊराव त्याला उद्देशून म्हणाले. त्यामुळे रवी संतापला. दरम्यान, रात्री ९ वाजता भाऊराव हे बाजेवर झोपले. मैनाबाई या पलंगावर नातवासोबत झोपल्या. रवी उठला आणि त्याने चाकूने भाऊराव यांच्या शरीरावर सपासप वार करायला सुरूवात केली. आदाजाने मैनाबाई उठल्या. त्यांनी रवीला मनाई केली. रवी पसार झाला. मैनाबाई यांनी आरडाओरड केली. शेजारी जमले पण तोपर्यंत भाऊराव यांचा मृत्यू झाला होता. शेजाऱ्याने रामटेक पोलिसांना माहिती दिली, त्यानंतर माहिती मिळताच पोलिसांचा ताफा तेथे पोहोचला. पंचनामा करून पोलिसांनी मृतदेह हॉस्पिटलकडे रवाना केला. पोलिसांनी खुनाचा गुन्हा दाखल केला. शोध घेऊन पोलिसांनी रवी याला अटक केली.

# निरोप घेतो देवा आता आज्ञा असावी...!

## लाडक्या बाप्पाला आज निरोप; मुंबईतील मंडळे, पोलिसांची सज्जता..

**मुंबई :** भजन, आरती, भाविकांच्या दर्शनासाठी रांगा अन् शिगेला पोहोचलेला उत्साह, आनंद असा माहोल गणेशोत्सवकाळात अनुभवल्यानंतर आज, शनिवारी गणरायांना भावपूर्ण वातावरणात निरोप दिला जाणार आहे. सार्वजनिक मंडळांसह, घरगुती गणपतींच्या विसर्जन मिरवणुकांचा जोर सर्वत्र असणार आहे. यासाठी सार्वजनिक गणेशोत्सव मंडळांनी जय्यत तयारी केली आहे.गणेशोत्सवाच्या आधीपासूनच मुंबईत आनंद टीपेला पोहोचला होता. गणेशमूर्तींच्या आगमन मिरवणुकांत शहर रंगले होते. आता येथे उत्साह असेल, तो विसर्जन मिरवणुकांचा. शनिवारी सकाळपासूनच मिरवणुकांना सुरुवात होईल. सर्व भाविकांचे आकर्षण असलेले लालबागचा राजा आणि ङ्गमुंबईचा राजाफ्ची मिरवणूक सकाळी आठ वाजता सुरू होणार आहे. पर्यावरणपूरक गणेशोत्सवासाठी ओळखला जाणारा ङ्गराजा तेजुकायाचाफ्च्या विसर्जन मिरवणुकीस सकाळी ७ वाजता पारंपरिक पद्धतीने प्रारंभ होईल.या गणरायाचा रथ दुपारी चिंचपोकळी येथे पोहोचल्यावर भाविकांकडून महाआरती होणार आहे, अशी माहिती मंडळाचे सदस्य सुशांत शिंदे यांनी दिली. तसेच ङ्गचिंचपोकळीचा चिंतामणीफ्च्या संपूर्ण विसर्जन मिरवणुकीत आरतीचे सूर ऐकू येणार आहेत. उपनगरातील विसर्जन मिरवणुका दुपारनंतर सुरू होणार आहेत. दादर चौपाटी, वर्सोवा चौपाटी येथे संध्याकाळी उशिरा त्या विभागातील गणेशमूर्ती विसर्जनासाठी पोहोचतील.



दरम्यान, पांढऱ्या रंगाचे सदरे, ओढण्या आणि फेटे घेण्यासाठी लालबाग, परळ परिसरात ग्राहकांची लगबग सुरू होती.गिरगावमधील खेतवाडी विभागातील मंडळांकडून विसर्जनासाठी सुयोग्य नियोजन करण्यात आले आहे. सर्व गल्ल्यांमधील गणपती विसर्जन मिरवणुका सकाळी १० ते ११च्या सुमारास सुरू होणार आहेत. मंडळांकडून विसर्जनासाठी विशेष सुरक्षिततेची काळजी घेतली जाते, असे माहिती खेतवाडीचा महागणपती मंडळाचे सभासद इर्मेन्युएल कारभारी यांनी दिली.

दैनिक जनसंचलन निडर निर्भिड व्यापक जनचळवळीचा प्रहरी!



# पुण्यासह ८ जिल्ह्यांना पावसाचा ऑरेंज अलर्ट, कोकण, मध्य महाराष्ट्रात अतिवृष्टीचा इशारा



**पुणे:** ऑगस्ट महिन्यात मुंबईत मुसळधार पाऊस होऊन चार दिवस मुंबई ठप्प पडली होती. त्यासोबत संपूर्ण राज्यात पावसाने गेल्या काही दिवसांत धुमाकूळ घातला होता. तर काही भागात पावसाने विश्रांती घेतली होती. मात्र, आता पुन्हा एकदा पावसाचा इशारा देण्यात आला आहे. हवामान विभागाकडून संपूर्ण राज्यात जोरदार पावसाचा इशारा देण्यात आला आहे. ३ सप्टेंबर ते ५ सप्टेंबरदरम्यान कोकण, मध्य महाराष्ट्रात अतिवृष्टी होणार असल्याची शक्यता वर्तवण्यात आली आहे. तर, विदर्भ, मराठवाडा येथे मुसळधार पावसाचा इशारा देण्यात आला आहे.हवामान विभागाने मुंबईला पावसाचा येलो अलर्ट देण्यात आला आहे. हवामान विभागाने मुंबईला अतिवृष्टीचा इशारा दिला आहे. तर, ठाणे, पालघर, पुणे, सातारा आणि कोल्हापूर घाट परिसरात ऑरेंज अलर्ट देण्यात आला आहे. यादरम्यान सोसाट्याच्या वाऱ्यासह पावसाच्या सरी बरसतील.सध्या बंगालच्या उपसागरात कमी दाबाचे नवे क्षेत्र निर्माण झाले आहे. त्यामुळे येत्या पुढील तासात मुसळधार पाऊस होण्याची शक्यता आहे. मध्य महाराष्ट्र, कोकण, मराठवाडा, विदर्भ आणि गोव्याच्या किनारपट्टीवर जोरदार पावसाचा अंदाज वर्तवण्यात आला आहे. त्यामुळे या आठवड्यात राज्यात पावसाचा जोर कायम राहणार आहे.बंगालच्या उपसागरात तयार झालेल्या कमी दाबाच्या क्षेत्रामुळे राज्यात पावासासाठी अनुकूल हवामान तयार झालं आहे. कोकण आणि घाटमाध्यावर पावसाच्या जोरदार सरी कोसळण्याची शक्यता आहे. हवामान विभागाने कोकणला पावसाचा ऑरेंज अलर्ट जारी केला आहे. यादरम्यान सोसाट्याच्या वाऱ्यासह जोरदार पाऊस कोसळणार असल्याचा इशारा देण्यात आला आहे.

# आशिया कप २०२५च्या संघात एन्ट्री न मिळाल्याबद्दल गोलंदाजाने व्यक्त केली खंत; भर कार्यक्रमात सिलेक्टरवर रागवला?

**मुंबई:** भारताचा स्टार वेगवान गोलंदाज आकाश दीप ने ओव्हलमध्ये इंग्लंडविरुद्धच्या शेवटच्या कसोटी सामन्यात झालेल्या दुखापतीतून सावरण्यासाठी दुलीप ट्रॉफीमध्ये भाग घेतला नाही. एजबॅस्टन येथे झालेल्या या कठीण दौऱ्यात त्याने १० सामने जिंकून देणाऱ्या विकेट्स घेतल्या. दुखापतीतून सावरल्यानंतर आकाश रविवार, ३१ ऑगस्टपासून नेट सेशन्स सुरू करेल. आकाश दीप सिलेक्टर्सबद्दल जे म्हणाला त्याची आता चर्चा रंगली आहे.
भारताचा स्टार वेगवान गोलंदाज आकाश दीप म्हणतो की, ड्ड्माझे स्वप्न क्रिकेटच्या मैदानावर सर्वोत्तम कामगिरी करणे आणि सर्व फॉरमॅटमध्ये खेळण्यासाठी स्वत:मध्ये सुधारणा करणे आहे.ड्ड इंग्लंडविरुद्धच्या शेवटच्या कसोटीत त्याने चमकदार फलंदाजी केली असली तरी, आकाशला अष्टपैलू खेळाडूचा किताब मिळवण्याची इच्छा नाही. गेल्या वर्षी ऑस्ट्रेलियामध्ये अनिर्णित राहिलेल्या मेलबर्न कसोटीत त्याने दोन षटकार मारले तेव्हा आकाशची फलंदाजी कौशल्ये प्रथम समोर आली.बंगाल क्रिकेट असोसिएशनच्या वार्षिक पुरस्कार सोहळ्याच्या वेळी माध्यमांशी बोलताना आकाश म्हणाला, ड्ड्जर संघाला माझ्या फलंदाजीची आवश्यकता असेल तर मी फलंदाजी करेन. माझे स्वप्न आहे की मी माझे सर्वोत्तम प्रदर्शन करावे आणि स्वत:मध्ये सुधारणा करावी जेणेकरून मी सर्व फॉरमॅटमध्ये खेळू शकेन, परंतु मी निवडकर्ता नाही. ओव्हलमध्ये दुसऱ्या डावात मी केलेल्या ६६ धावा देखील महत्त्वाच्या होत्या, परंतु गोलंदाज असल्याने मला नेहमीच माझ्या गोलंदाजीने सामने जिंकायचे असतात.ड्ड्आकाश दीप म्हणाला की, ड्ड्कोणतीही दुखापत नाही, फक्त थोडासा परिणाम झाला आहे. मी उद्यापासून गोलंदाजी सुरू करेन. मला बरे वाटत आहे. मी सहा महिन्यांपासून सतत खेळत आहे, त्यामुळे माझ्या शरीराला थोडी विश्रांतीची आवश्यकता होती. जेव्हा तुम्ही इंग्लंड किंवा ऑस्ट्रेलियाला जाता तेव्हा पाच सामने खेळणे कठीण असते. तुम्हाला मानसिक आणि शारीरिकदृष्ट्या मजबूत असले पाहिजे.ड्ड्‍ आता भारताची पुढील मालिका वेस्ट इंडिजविरुद्ध रंगणार आहे. हा मालिका ऑक्टोबरमध्ये खेळवली जाणार आहे. यानंतर भारत आणि ऑस्ट्रेलियामध्ये वनडे मालिका खेळवली जाणार आहे.

# इन्स्टाला ओळख, विद्यार्थिनीला प्रेमाच्या जाळ्यात ओढलं, अपहरण करुण अत्याचार; तुरुंगातून बाहेर आल्यावर पुन्हा...

**नागपूर :** प्रेमाच्या जाळ्यात अडकवून अपहरण करून विद्यार्थिनीवर बलात्कार प्रकरणात अटक केल्यानंतर पोलिस कोठडीतून फरार झालेल्या आरोपीला हिंगणा पोलिसांनी चाळीसगाव येथे अटक केली. गणेश भिकन गोसावी (वय २०, रा. विखरन, ता. एरंडोल, जि. जळगाव) असं अटकेतील आरोपीचं नाव आहे. तो मालवाहू वाहनावर चालक आहे.पोलिसांकडून प्राप्त माहितीनुसार, १७ वर्षीय मुलगी बारावीत शिकते. दीड वर्षांपूर्वी तिची इन्स्टाग्रामवर गणेशसोबत ओळख झाली. त्याने तिला प्रेमाच्या जाळ्यात अडकविले. नोव्हेंबर महिन्यात गणेशने तिचं अपहरण केलं. तिच्यावर बलात्कार केला. या प्रकरणी पोलिसांनी गुन्हा दाखल करून गणेशला अटक केली. पीडित मुलीला नातेवाइकांच्या स्वाधीन केलं. १० जुलैला गणेशने पुन्हा तिचं अपहरण केले. तिच्यावर बलात्कार केला. त्यानंतर पीडित मुलगी घरी परतली. नातेवाइकांना घडलेली




घटना सांगितली. नातेवाइकाने हिंगणा पोलिसांत तक्रार केली.पोलिसांनी अपहरण व बलात्कारासह विविध कलमान्वये गुन्हा दाखल केला. हिंगणा पोलिसांनी ३० ऑगस्टला गणेश याला मध्यप्रदेशातील धार येथील पिथमपूर येथून अटक केली. त्याला नागपुरात आणून न्यायालयात हजर केले. न्यायालयाने त्याची ३ सप्टेंबरपर्यंत पोलिस कोठडीत रवानगी केली. यादरम्यान पोलिसांनी वैद्यकीय तपासणीसाठी त्याला हिंगण्यातील प्राथमिक आरोग्य केंद्रात नेले. पोलिसांच्या हातावर तुरी देऊन गणेश तेथून पसार झाला. या प्रकरणी पोलिसांनी गुन्हा दाखल केला. वरिष्ठ पोलिस निरीक्षक जितेंद्र बोबडे यांच्या मार्गदर्शनाखाली उपनिरीक्षक कृष्णा खेबडे, हेडकॉन्स्टेबल अजय गिरडकर, आनंद वानखेडे ,सचिन इंगळे यांनी गणेशचा शोध सुरू केला. गणेश हा चाळीसगाव परिसरात असल्याची माहिती पोलिसांना मिळाली. स्थानिक पोलिसांच्या मदतीने हिंगणा पोलिसांनी सापळा चरून त्याला अटक केली. त्याला नागपुरात परत आणलं.

# अंगावरच्या कपड्यांची दोरी करून खिडकीला बांधली

## येरवड्यात महिला रुग्णाचा टोकाचा निर्णय, काय घडलं?

**येरवडा :** परभणी न्यायालयाच्या आदेशाने येरवडा मनोरुग्णालयात उपचार घेणाऱ्या कैदी महिला रुग्णाने अंगातील कपड्यांची दोरी करून खिडकीला बांधून घेऊन गळफास घेऊन आत्महत्या केली. बुधवारी (तीन सप्टेंबर) सकाळी ही घटना घडली. लक्ष्मी अशोककुमार (वय ४५, रा. परनाला, जि. झज्जर, हरियाणा) असे आत्महत्या केलेल्या महिलेचे नाव आहे.या प्रकरणी येरवडा पोलिस ठाण्यात अकस्मात मृत्यूची नोंद करण्यात आली आहे. लक्ष्मी परभणी कारागृहात शिक्षा भोगत होती. तिचे मानसिक संतुलन बिघडल्याने कारागृहाने तिच्यावर उपचाराची गरज असल्याची विनंती न्यायालयाकडे केली होती. परभणी न्यायालयाच्या आदेशाने लक्ष्मीला ३१ जुलै रोजी येरवडा मनोरुग्णालयात दाखल करण्यात आले.बुधवारी लक्ष्मी वार्डात असताना अंगावरील कपडे काढून तिने त्याची दोरी तयार केली. ती दोरी




खिडकीला बांधली आणि गळफास घेऊन आत्महत्या केली. महिला रुग्णाने गळफास घेतल्याचे समजताच डॉक्टरांचे पथक धावत वॉर्डात गेले. वैद्यकीय तपासणी केली असता ती मृत झाली होती. प्रशासनाने तातडीने येरवडा पोलिसांना घटनेची माहिती दिली.येरवडा प्रादेशिक मनोरुग्णालयात रुग्ण वॉर्डात गळफास घेऊन आत्महत्या करण्याचा घटना थांबलेल्या नाहीत. गेल्या महिन्यात १० ऑगस्ट रोजी खुनाच्या गुन्ह्याखाली शिक्षा भोगणाऱ्या अडरट्रायल मनोरुग्ण कैद्याने पायजमाच्या साह्याने गळफास घेऊन आत्महत्या केली होती. वारंवार घडणाऱ्या या घटनांमुळे रुग्णांची सुरक्षा चव्हाट्यावर आली आहे

# मॅरेथॉन



मोजावे वाळवंटाच्या दक्षिणेकडील काठांवर वाढलेला १२ वर्षांचा मुलगा, क्वचित बस चुकल्यावर शाळेत जाण्यासाठी दहा मैलांचा प्रवास करत असतानाच धावण्याच्या प्रेमात पडला. लॉस एन्जेलिस स्थायिक धावपटू ङ्करिओ लेकशोर.फएक शांत लक्षपूर्वक धावण्याची दिनचर्या. दररोज किमान १० मिनिटे असे दोन आठवडे धावण्याच्या उद्दिष्टाने धावायला सुरुवात केली आणि आज ती संस्मरणीय कामगिरी ठरली. आजही दररोज धावणे हा त्यांच्या उद्दिष्टाचा एक बेंचमार्क ठरला.

स्पेन तरुणी कॅरोलिना, दुर्दैवाने आई आणि लग्न संपल्यानंतर स्वतः वरचा, स्वतःच्या आयुष्यावरचा राग दूर करण्यासाठी ट्रेडमेलवर स्वतःलाच आव्हान देत होती. प्रशिक्षकांच्या साथीने कठीण काळ जाताच २१ किमी धावून तो विजय आईला समर्पित केला. धावताना अडचणी खूप आल्या. कॅरोलिना म्हणते कधीही धीर सोडू नका, आपले धैय विसरू नका. स्वतःला आव्हान देण्याचा उत्तम मार्ग; धावणे!

मॅरेथॉनमध्ये हजारो माणसे धावतात. प्रत्येकाचे उद्दिष्ट वेगळे. एकाला आपली क्षमता आजमावून पाहायची होती, दुसऱ्याला स्वतःचाच आधीचा विक्रम मोडायचा होता. तिसऱ्याला मॅरेथॉनचा अनुभव घ्यायचा होता, चौथा टी-शर्ट आणि मित्रांसोबत आनंदासाठी. काही आजारांवर, व्यसनावर, ताणावर मात करण्यासाठी, तर काही फिटनेससाठी मॅरेथॉनमध्ये भाग घेतात.

१. स्नायूला दोन वेळा दुखापत होऊनही ऑपरेशन झाल्यानंतर कालांतराने चार पाच मॅरेथॉन पूर्ण करणारे दीक्षित, २. ङ्कतू जिंदगी में कभी दौड नहीं पाएगा, कमसे कम थोडा चालना तो सिखोफ मित्राचे हे शब्द ऐषोरामी जीवन जगणाऱ्या सतीश गुजराल यांना लागले. त्यानंतर सलग पाच वर्षे दक्षिण आफ्रिकेतील अनेक मॅरेथॉन रनरचे मानाचे तुरे त्यांनी मिळविले. पळण्यासारखा दुसरा व्यायाम नाही आणि आनंदही नाही.

मॅरेथॉनमध्ये धावण्याआधी प्रत्येकाला आपण का धावत आहोत? त्यामागचे उद्दिष्ट स्पष्टपणे माहीत असणे आवश्यक आहे. तुमचे उद्दिष्ट तुम्हाला पुढे नेणारे हवे. जेव्हा निराशेने जगणे अपरिहार्य होते, तेव्हा मॅरेथॉनचा विचार करा. मॅरेथॉन शारीरिक आहे तरी त्यासाठी मानसिक दृढता हवी. मॅरेथॉनने शारीरिक आरोग्य चांगले राहते. प्रशिक्षणाशिवाय मॅरेथॉनमध्ये भाग घेऊ नये.

मॅरेथॉन! लांब पल्ल्याची प्रमुख रस्त्यावरून लोकांसमावेत एकत्र धावण्याची शर्यत! जानेवारीतील दुसरा रविवार. या वर्षी १५ जानेवारीला १८व्या टाटा मुंबई मॅरेथॉनमध्ये ५५००० पेक्षा जास्त स्पर्धक सहभागी. सर्वांचे अभिनंदन! टाटा मुंबई मॅरेथॉन जनतेच्या आरोग्याचा विचार करते. मॅरेथॉनमध्ये स्पर्धेची विभागणी असल्याने आपल्या कुवतीनुसार सामान्य जनतेसह अनेक नामवंत, भारतीय धावपटू गोपी, श्रीनू, सुधा सिंग सह अनेक हजेरी लावतात.

प्राचीन काळी ग्रीस देशांत मॅरेथॉन गावी पर्शियनसोबत झालेल्या लढाईत ग्रीक जिंकले. मॅरेथॉन विजयाची बातमी सांगण्यासाठी अंगावरच्या शस्त्रासहित एक सैनिक तिथपासून अथेन्सपर्यंत रस्त्यावरून धावत गेला. त्या सैनिकाने रस्त्यावरचे कापलेले ते अंतर ४२.१९५ किमी होते. तेच अंतर अधिकृतरीत्या स्वीकारले गेले. गावाचे मॅरेथॉन हे नाव स्पर्धेचे झाले. दुर्दैवाने दमल्याने त्या सैनिकाचा अंत झाला. भारतात अनेक ठिकाणी मॅरेथॉन स्पर्धा होतात.

मुंबई मॅरेथॉन चॅम्पियन रायबरेली एक्स्प्रेस सुधा सिंगला अभ्यासापेक्षा लहानपणापासून खेळाची आवड. ट्यूशनला न जाता ट्रॅकवर, एक्स्प्रेस ट्रेनच्या बाजूनेही ती धावत होती. तिच्या वडिलांना समजताच त्यांनी तिला ट्रेनिंगला पाठविले. एक दिवस मार्निंग वॉकच्या वेळी लोकांना धावताना पाहिले. शाळा सोडल्यावर ३० वर्षांनी आपण पळू शकू का? मन स्वस्थ बसेना. ठाणे मॅरेथॉन, काही वर्षांनी मुंबई टाटांची पूर्ण मॅरेथॉन प्रशिक्षण घेऊन अंजली कुलकर्णीने यशस्वीरीत्या पूर्ण केली.

मॅरेथॉनमध्ये दीर्घकाळ धावण्याची क्षमता हवी. म्हणून वेगाने न धावता संपूर्ण शर्यत समान गतीने म्हणजेच वेग नेमका ठेवून शेवटपर्यंत थकवा न येता धावणे (समपेसिंग) योग्य. त्यासाठी दररोज सराव हवा. मॅरेथॉनमध्ये भाग घेण्यासाठी स्टॅमिना, जिद्द, समर्पण हवे. मुख्यतः अंतिम रेषा जोपर्यंत दिसत नाही, तोपर्यंत धावतच राहा. धावताना अनेक अडचणीही येतात. धावणे सोडून द्यावे, पाठी फिरावे, थांबावे असे वाटते; परंतु रेंगाळा, पण न थांबता चालत राहा नि अंतिम रेषा गाठा.

पोलिओची लस वेळेवर न दिल्या गेल्यामुळे पोलिओग्रस्त झालेल्या मुलाच्या कथेवर आधारित चित्रपट ङ्कमॅरेथॉन जिंदगी!फ वडिलांच्या प्रेरणेने अपंगत्वार मात करीत मुलाने यशाचे शिखर गाठले. दिव्यांगाची संघटना सुरू केली असा हा दिव्यांगाच्या संघर्षावरचा चित्रपट. समाजात बरेचजण मानसिक अपंग असल्याने त्यांचे आयुष्य अशांततेत चालू राहते. त्यांनी हा चित्रपट पाहावा.

जीवन एक मॅरेथॉन आहे स्प्रिंट नाही स्प्रिंटमध्ये अल्पावधीवर लक्ष केंद्रित करून वेगाने धावतो. घाईत चुकीचा निर्णय घेतला जाऊ शकतो. मॅरेथॉनमध्ये दूरच्या पल्ल्यावर लक्ष केंद्रित करून धीराने, धीम्या गतीने धावून पाठलाग चालू ठेवायचा लांब पल्ल्याच्या प्रवासासाठी मंद गती. ससा कासव शर्यत. समस्यांचे मूळ तणावात असते. शांत राहा. आजूबाजूच्या घडणाऱ्या गोष्टींचा सखोलपणे विचार करून निर्णय घ्या. धावण्याचा आनंद घेत वाटेतले छोटे-छोटे यश साजरे करा. जीवनाप्रमाणे मॅरेथॉनमध्येही लांबचे अंतर पार करताना, काही कालावधी खूप कठीण, तर काही खूप सोपा जातो. येणाऱ्या चढउताराच्या वेळी धावताना मार्गातले अडथळे जाणून, चालण्याचा वेग नियंत्रित करता आला पाहिजे. तुमचा प्रशिक्षणावर विश्वास हवा. ङ्कअंतिम रेषा हेच धेय. जो अंतिम रेषा पार करतो, तो विजयी.फ येथे नंबर नाही. प्रत्येकाचे स्वप्न वेगळे, उद्दिष्ट्य वेगळे, त्यामुळे सारेच यशस्वी. जीवन जगण्याचा महत्त्वाचा धडा मॅरेथॉनचे प्रशिक्षण देते. मॅरेथानमध्ये भाग घेतल्यावर आपल्या जीवनात बदल घडून येतो.

साधारणपणे टाटा मुंबई मॅरेथॉनची आखणी समुद्रालगतच्या मार्गाने असते. समुद्रासोबत रस्त्याच्या कडेला उस्फूर्तपणे स्पर्धकांना चिअरअप करणारे मुंबईकर. तो आनंद मीही घेतला आहे. लहान, तरुण मुलापासून ज्येष्ठ नागरिक, व्हीलचेअरवरील अपंग, हातात बॅनर्स, साऱ्यांचा उत्साह पाहून पुढच्या वर्षी अनेकजण सहभागी होतात. माझ्या आजच्या लेखाचा हाच उद्देश, आनंदासाठी, तंदुरुस्तीसाठी मॅरेथॉनमध्ये भाग घ्या.

# प्रामाणिकपणा!

मी तेव्हा सहावी-सातवीत असेन. आईसोबत एका वाण्याच्या दुकानात गेले होते. त्या वयात माझे लक्ष दुकानातील रंगीबेरंगी चॉकलेटकडे, आकर्षक वेस्टनातील वस्तूंकडे, काचेच्या बरणीत ठेवलेल्या खाद्यपदार्थांकडे होते.

आईला साखर विकत घ्यायची होती. त्या दुकानदाराने आईच्या हातात एक दहाची, एक पन्नासची नोट आणि साखरेचा पुडा दिला. त्याबरोबर आई म्हणाली की, मी तुम्हाला पन्नासची नोट दिली, तर तुम्ही मला फक्त दहा रुपये परत द्यायला हवे. असे बोलून आईने पन्नासची नोट त्याच्यासमोर धरली. ते पाहून दुकानदार आईला म्हणाला की, तिने त्याला शंभरची नोट दिली होती. त्यामुळे त्याला साठ रुपये परत करणे भाग आहे. मग दोघेही आपापली बाजू मांडू लागले. आई म्हणाली की, तिच्या पर्समध्ये गेले चार-पाच दिवस ती एकच पन्नासची नोट होती, तर ती शंभरची नोट कशी काय देणार? दुकानदार म्हणाला की, तुम्ही शंभराची नोट दिल्यावर मी पन्नासचे सुट्टे कसे देणार? बराच वेळ चाललेला हा संवाद मी मन लावून ऐकू लागले. दुकानातील वस्तू पाहण्यात गुंतल्यामुळे आईने कोणती नोट दिली, ते मी पाहिले नाही. मग त्या पन्नासच्या नोटेचं काय झालं मला आठवत नाही. पण त्यादिवशी एक गोष्ट मी आपोआप शिकले ती म्हणजे प्रामाणिकपणा! काही गोष्टी शिकवल्या जात नाहीत, त्या आपण शिकत जातो. त्यातीलच एक महत्त्वाचा गुण म्हणजे प्रामाणिकपणा!



# अखेर लेखी आश्वासनानंतर आमरण उपोषणाला तात्पुरती स्थगिती; फसवणूक प्रकरणावर न्यायासाठी संघर्ष सुरूच राहील

**जनसंचलन/ डोणगाव**

अवैध सावकारी बिसी व फायनान्स चिट्सच्या माध्यमातून लाखो रुपयांची फसवणूक झाल्याच्या आरोपांवरून डोणगाव ग्रामपंचायत कार्यालयासमोर २ सप्टेंबरपासून सुरु असलेले आमरण उपोषण अखेर ठाणेदार अमरनाथ नागरे यांच्यासह संबंधित विभागातील अधिकाऱ्यांनी लेखी आश्वासन दिल्यानंतर तात्पुरते स्थगित करण्यात आले आहे. उपोषणकर्ते संदीप नारायण पळसकर, गजानन सखाराम पांडव, संजय विष्णू परमाळे, सुरेश दशरथ गवळी, अमजद खान आदींनी विविध शासकीय यंत्रणांकडे तक्रारी करूनही कोणतीही ठोस कारवाई न झाल्यामुळे उपोषणाचा मार्ग स्वीकारला होता.या प्रकरणात डोणगाव येथील गजानन त्र्यंबक आखाडे याच्यावर श्रीराम चिट्स फायनान्स कंपनीचा एजंट म्हणून काम करत असताना आयटीआर रिटर्न, फायनान्स व्यवहार, बिसी योजनांद्वारे फसवणूक केल्याचा आरोप आहे.



या संदर्भात १० फेब्रुवारी रोजी ही तक्रार देण्यात आली होती, मात्र त्यावर कोणतीही कार्यवाही न झाल्याने अखेर आंदोलकांनी आमरण उपोषण सुरु केले होते. २ सप्टेंबरपासून सुरु असलेल्या उपोषणाचा तिसरा दिवस असल्याने याची दखल घेत ठाणेदार अमरनाथ नागरे तसेच संबंधित विभागातील अधिकाऱ्यांनी उपोषणस्थळी भेट देऊन आंदोलकांशी चर्चा केली. पुढील कार्यवाहीसाठी वरिष्ठ अधिकाऱ्यांचे मार्गदर्शन घेऊन योग्य ती कारवाई केली जाईल व संबंधितांना न्याय मिळवून देण्यासाठी प्रयत्न केले जातील, असे लेखी आश्वासन त्यांनी दिले. त्यानंतर उपोषण तात्पुरते स्थगित करण्यात आले. उपोषणकर्त्यांनी स्पष्ट केले की, जर प्रशासनाने वेळेत कारवाई केली नाही, तर उपोषण आणखी तीव्र आंदोलन छेडले जाईल. हा लढा केवळ आमच्यासाठी नव्हे, तर समाजातील इतर फसवणूक ग्रस्तांसाठीही आहे, असे त्यांनी सांगितले.

# मा.श्री.एस.एम.देशमुख सर यांनी दिली छत्रपती संभाजीनगर ला भेट..



**जनसंचलन/बुलढाणा**

अखिल भारतीय मराठी पत्रकार परिषदेच्या डिजिटल मिडिया परिषदेचे राज्यव्यापी अधिवेशन दिनांक १४ सप्टेंबर २०२५ रोजी छत्रपती संभाजीनगर येथील क्रांती चौकाजवळ असलेल्या संत एकनाथ नाट्य मंदिर याठिकाणी होत आहे.या राज्यव्यापी अधिवेशनाच्या पूर्व तयारी साठी आज अखिल भारतीय मराठी पत्रकार परिषदेचे मुख्य विश्वस्त मा.श्री.एस.एम.देशमुख सर विश्वस्त मा.शरद पाबळे,सरचिटणीस प्रा.सुरेश नाईकवाडे,डिजिटल मिडिया परिषदेचे प्रदेशाध्यक्ष अनिल वाघमारे,परिषदेचे राज्य उपाध्यक्ष मा.गणेश मोकाशी, छत्रपती संभाजीनगर मराठी पत्रकार परिषदेचे अध्यक्ष - बालाजी सूर्यवंशी, कार्याध्यक्ष - कानिफ अन्नपूर्णे, सचिव- प्रकाश भगनुरे, उपाध्यक्ष- महादेव जामणीक,डिजिटल मिडिया परिषदेचे प्रदेश सदस्य जितेंद्र सिरसाठ,डिजिटल मिडिया परिषदेचे बीड जिल्हा उपाध्यक्ष विश्वंभर मुळे व इतर पत्रकार बांधवांनी नियोजीत संत एकनाथ रंग मंदिर, क्रांती चौक येथे भेट देऊन पाहणी केली. तसेच छत्रपती संभाजीनगर येथील पदाधिकाऱ्यांना या राज्यव्यापी अधिवेशना बाबत मा.श्री.एस.एम. देशमुख सर यांनी मार्गदर्शनही केले.




# फ्रेंड्स च्या बाप्पांनी या रुग्णांना केले फ्रेंड! घडवली आरोग्यसेवा!







**जनसंचलन/बुलढाणा**

गणेशोत्सवाला आरोग्य सेवेची जोड देत, येथील कारंजा चौकातील फ्रेंड्स गणेश मंडळाने काल आयोजित केलेल्या आरोग्य शिबिराला उस्फुर्तच चांगला मोठ्या प्रमाणात प्रतिसाद लाभला आहे. शुगर व बीपी तपासणीचा बुलढाणा शहरातील अनेक रुग्णांनी लाभ घेतला. शहरातील कारंजा चौक येथील फ्रेंड्स गणेशोत्सव मंडळ दरवर्षी समाजोपयोगी उपक्रम राबवीत असते.या वर्षी सुध्दा त्यांनी ५ सप्टेंबरला देखील त्यांनी धार्मिक परंपरा जपत आरोग्य सेवेचा उपक्रम राबविला.या उपक्रमाला उदंड मोठया प्रमाणात प्रतिसाद लाभला. सदर आरोग्य शिबिरात नागरी आरोग्यवर्धिनी केंद्र,कारंजा चौक बुलढाणाच्या डॉ.सुनिता बडगे,चेतन लहाने,निलेश जुमडे,सुरेखा गायकवाड,अर्चना मोरे,विजया ठाकरे, शीतल कंकाळे यांनी सेवा दिली.या शिबिरामध्ये बुलढाणा शहरातील अनेक नागरिकांनी आपली तपसाणी करून घेतली आहे.शिबिर यशस्वी करण्यासाठी गणेश मंडळाचे यतीन शर्मा,पवन डोंगरदिवे,आर्यन शर्मा, ओम कायस्थ, शुभम कायस्थ,अथर्व परांजपे,वंश शर्मा,धीरज व्यास,ओम वर्मा,काव्य वेदमुथा,अभिनव भगत,अभिनव भगत, लकी शर्मा,आलोक चंदन,वंश जोशी,सुनदाय महाजन,कृष्ण चंदन,आकश पडोळ यांनी परिश्रम घेतले आहे


# बाईपण भारी देवा!

## शेतकरी महिलांनी शेतातच पुकारले बेमुदत उपोषण!




जनसंचलन/बुलढाणा

शेत रस्त्यांसाठी लोकप्रतिनिधी उदासीन दिसून येताहेत. दोन वर्षापासून हा प्रश्न रेंगाळत असून, रस्त्यासाठी रुईखेड मायंबा येथील महिलाशक्ती एकवटली व त्यांनी भर पावसातच दोन दिवसापासून शेतातच बेमुदत उपोषणाचा पवित्रा घेतला आहे. रुईखेड मायंबा येथील महिला शेतकऱ्यांनी गेल्या दोन ते तीन दिवसापासून भर पावसात शेतातील रस्ता खुला करून द्यावा, या मागणीसाठी बेमुदत उपोषण सुरू केले आहे. मात्र महसूल यंत्रणेला याचे सोयरेसुतक दिसून येत नाही. प्रशासनाने अद्यापही या शेतकऱ्यांच्या उपोषणाची साधी दखलही घेतली नाही. उपोषणकर्ते शेतकऱ्यांची या रस्त्यावर जवळपास १०० एकराच्या वर शेती आहे. या शेतामध्ये जाण्यासाठी जो वहिवाटीचा वडिलोपार्जित रस्ता होता, तो सुरुवातीलाच एका शेतकऱ्याने अडवल्याने शेतकऱ्यांचा शेतामध्ये जाण्याचा रस्ता बंद झाला. गेल्या दोन वर्षापासून रस्ता अडवल्याने या शेतकऱ्यांना शेतीच्या कामासाठी अडसर निर्माण झाला आहे. पेरणीसाठी सुद्धा या शेतकऱ्यांना ट्रॅक्टर, बैलगाडी किंवा इतर साधने शेतामध्ये नेता येत नाही. त्यामुळे अनेक शेतकऱ्यांची शेती पडीत सुद्धा आहे. तर काही शेतकऱ्यांनी दुसऱ्याच्या शेतामधून विनंती करून आपल्या शेतात पेरणी केली मात्र आता पावसाचे दिवस असल्यामुळे आणि शेती पेरलेली असल्यामुळे इतर शेतकरी त्यांच्या शेतामधून या शेतकऱ्यांना जाऊ देत नाही. परिणामी शेतकऱ्यांच्या शेतातील जी काही शेतीची कामे आहेत, ती सध्या रेंगाळलेली आहेत. शेतकऱ्यांना बी- बियाणे असेल खत असेल डोक्यावरती न्यावे, लागत असून मजुरांना सुद्धा शेतामध्ये जाता येत नाही.अशा परिस्थितीमध्ये जो संबंधित शेतकऱ्याने रस्ता अडवलेला आहे, तो रस्ता खुला करून द्यावा, या मागणीसाठी गेल्या दोन वर्षांपासून हे शेतकरी महसूल प्रशासनाकडे चकरा मारताहेत. मात्र महसूल प्रशासनाने अद्यापही या शेतकऱ्यांचा रस्ता खुला करून दिला नाही, परिणामी शेतकऱ्यांनी आता शेतामध्येच भर पावसात आमरण उपोषण सुरू केले असून यामध्ये महिला शेतकऱ्यांची सुद्धा संख्या मोठी आहे. त्यामुळे तात्काळ महसूल प्रशासनाने या शेतकऱ्यांच्या मागणीकडे लक्ष देऊन त्यांचा रस्ता खुला करून द्यावा, अशी मागणी उठत आहे.




# धाडमध्ये ऐवढी दहशतीची धार ९५ गुंड केले तडीपार!

जनसंचलन/बुलढाणा




जिल्हा पोलीस दल गुन्हेगारांना त्यांच्या कारवायांवर वचक बसवण्यासाठी आणि गुन्हेगारी कमी करण्यासाठी तडीपार करण्यावर भर देत आहेत, ज्यामध्ये सराईत गुन्हेगारांचा रेकॉर्ड तपासून जिल्हाधिकारी किंवा पोलीस आयुक्तांच्या आदेशाने तडीपार केले जाते. ही प्रक्रिया महाराष्ट्र पोलीस अधिनियम, १९५१ च्या कलम ५५ अंतर्गत येते. अशीच तडीपाराची कारवाई अप्पर पोलीस अधीक्षक अमोल गायकवाड यांच्या आदेशावरून धाड गावात करण्यात आली.या कारवाईत तब्बल ९५ गुंडांना सण- उत्सवाच्या काळात तडीपार करण्यात आले आहे.धाड गाव हे अतिसंवेदनशील म्हणून गणल्या जाते. उत्सवाच्या काळात या गावावर पोलिसांची करडी नजर असते. उत्सव काळात कायदा व सुव्यवस्था अबाधित राखण्यासाठी गुन्हेगारी पार्श्वभूमी असलेल्या गुंडांवर अंकुश लावण्यासाठी विशेष कार्यकारी दंडाधिकारी तथा अप्पर पोलीस अधीक्षक कार्यालयात उपविभागीय पोलीस अधिकारी यांच्या मार्फत कलम १६३ (२) भारतीय न्याय सुरक्षा संहिता २०२३ अंतर्गत ५ सप्टेंबर ते ६ सप्टेंबर या दोन दिवसासाठी ९५ गुन्हेगारांना एक सप्टेंबर रोजी बुलढाणा जिल्ह्याच्या हद्दीतून हद्दपार करण्यासाठी प्रस्ताव पाठविण्यात आले होते.दरम्यान ही कारवाई जिल्हा पोलीस अधीक्षक निलेश तांबे,अपर पोलीस अधीक्षक अमोल गायकवाड,उपविभागीय पोलीस अधिकारी सुनील पाटील,स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक सुनील अंबुलकर यांच्या मार्गदर्शनाखाली धाडचे ठाणेदार प्रताप भोस व त्यांच्या टीमने केली आहे.

**ADMISSION NOTICE 2025-2026**

LATE RAMBHAUJI LINGADE FOUNDATION'S

**CAMBRIDGE COLLEGE OF PHARMACY, BULDHANA**

[Approved by PCI, New Delhi , Recognized by Govt. of Maharashtra, & affiliated by MSBTE, Mumbai & Dr. Babasaheb AmbedkarTechnological University ,Lonere ]

**DIRECT SECOND YEAR IN PHARMACY (DSP) – SECOND YEAR**

**AGAINST CAP SEATS**

Applications are invited from eligible candidates for admission to First Year B. Pharmacy In Academic Year 2025-2026 to Fill Against Cap Vacancies

**SCHEDULE ACTIVITIES FOR FIRST YEAR DIPLOMA IN PHARMACY**

| SR.NO | ACTIVITIES | SCHEDULE |
|---|---|---|
| 1 | Invitation of Application along with necessary documents | 07/09/2025 to 10/09/2025 |
| 2 | Display Of Provisional Merit List | 11/09/2025 |
| 3 | Sunmission Of Gravience if any | 11/09/2025 |
| 4 | Display of Final Merit List | 11/09/2025 |
| 5 | Reporting For admission | 11/09/2025 - 12/09/2025 Upto 5:00 Pm |

CAMBRIDGE COLLEGE OF PHARMACY

**Eligibility:** As per Competent Authority & Government of Maharashtra.
Application forms are available at the College office.
Admission given in Government Fees only

Principal — Cambridge College of Pharmacy,Buldana

President — Late Rambhauji Lingade Foundation's

-------------------------For Details Contact -------------------------

CAMBRIDGE COLLEGE OF PHARMACY, LINGADE KNOWLEDGE PARK C HIKHILI ROAD ,BULDHANA,443001

Mob:- 9890251512 , 9561208679 ,9763849595

Website: https://cambridgepharmacynursing.com/ Email: ccop.buldhana@gmail.com